ग्राम विकास विभाग/आस्था-३
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०१७.

**महाराष्ट्र विकास सेवा गट-अ व ब मधील अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत नागरी सेवा मंडळ (१) च्या बैठकीबाबत पूर्वसूचना- नोव्हेंबर, २०१७**

ग्राम विकास विभागाच्या दिनांक १६.८.२०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र विकास सेवा गट-अ व ब मधील अधिकाऱ्यांची सरळसेवा/पदोन्नतीने नियुक्ती तसेच सर्वसाधारण/विनंती/मुदतपुर्व बदलीने पदस्थापना करतेवेळी सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (१) ची माहे नोव्हेंबर, २०१७ मधील बैठक दिनांक १५.११.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विकास सेवा गट-अ आणि गट-ब मधील बदलीसाठी इच्छूक असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांचे विनंती अर्ज या विभागाच्या दिनांक १६.८.२०१७ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या विहित प्रपत्रात vijayd.shinde71@nic.in या ई-मेलवर दिनांक १३.११.२०१७ पर्यंत सादर करावेत. तद्नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

************